ISSN : 2278-5914




## सातारा इतिहास संशोधन मंडळ, सातारा

# SANSHODHAN

Peer Reviewed Research Journal
Issue - XIII

## संशोधन

अंक तेरावा

# SANSHODHAN

# संशोधन

**Peer Reviewed**
**Research Journal**

पिअर रिव्ह्यू
रिसर्च जर्नल

**Issue - XIII**
**October 2022**

अंक तेरावा
ऑक्टोबर २०२२

**ISSN 2278-8914**

| | | |
|---|---|---|
| **Publisher** | : | **Prof. Dr. Mrs. Urmila Kshirsagar**<br>President,<br>Satara Itihas Sanshodhan Mandal, Satara |
| **Publication** | : | **9 October 2022** |
| **Donated Value** | : | **300/-**<br>(Rs.300 Only) |
| **Printing** | : | **Type Innovators**<br>195, Sadashiv Peth, Moti Chowk, SATARA<br>Mob. : 9421585255 |


(All rights reserved under the
Satara Itihas Sanshodhan Mandal, Satara)

(The views expressese by the authors in
'Sanshodhan' Peeer Reviewed Research Journal
in the issue are their own.
The editor and publisher are not responsible for them.)

| अ. क्र. | संशोधकाचे नाव | शोधनिबंधाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| ४४. | प्रा.डॉ.उर्मिला क्षीरसागर | महर्षी विठ्ठल रामजी शिंदे -वैचारिक योगदान | ३२८ |
| ४५. | प्रा.सौ.जाधव सुषमा | एकोणिसावे शतक - बदलते स्त्रीजीवन | ३३६ |
| ४६. | प्रा.डॉ.हेमलता यु.मुकणे | आदिवासीचे लोकनृत्य : एक शोध | ३४३ |
| ४७. | प्रा.भावेश अरूण भोईर | पनवेल तालुक्यातील आदिवासी समुदायाची शैक्षणिक प्रगती:एक संशोधनात्मक अध्ययन | ३४७ |
| ४८. | श्री.राहुल किसन गंगावणे | सातारा जिल्ह्यातील हुतात्मा स्मारके : एक ऐतिहासिक अभ्यास | ३५२ |
| ४९. | प्रा.गौतम गणपती काटकर | कोळीगेरी येथील वैशिष्ट्यपुर्ण दुर्मिळ वीरगळ | ३५८ |
| ५०. | प्रा.डॉ.सुवर्णा पाटील | मूर्ती आणी चेहरा नसलेलं ग्रामदैवत म्हसोबा | ३६३ |
| ५१. | कु.श्रद्धा सुधीर वाघमारे | ऐतिहासिक दस्तावेजातून उलगडलेली मंदिरे | ३६८ |
| ५२. | प्रा.डॉ.भेलोंडे जगदीश व्यंकटराव | बनशेंद्रा गावचा इतिहास | ३७९ |
| ५३. | प्रा.डॉ.सुरेश मारूती चव्हाण | जत संस्थानातील ऐतिहासिक वास्तू व त्यांची सद्यस्थिती | ३८४ |
| ५४. | प्रा.डॉ.संजीव सुखलाल बोडखे | सातारा शहरातील साथीचे रोग व त्यावरील नगरपालिकेच्या उपाययोजना | ३९१ |
| ५५. | प्रा.डॉ.दत्तात्रय जयसिंग ओवाळे | स्वातंत्र्यपूर्व काळातील सातारा शहराच्या विकासातील सामाजिक संस्थांचे योगदान | ३९८ |
| ५६. | प्रा.डॉ.हमीद उमरअली काझी | संगीत दिग्दर्शक लता मंगेशकर | ४०४ |
| ५७. | प्रा.डॉ.टिके अनिल शिवाजी | श्रीमंत मुधोजीराव निंबाळकर यांचे फलटण संस्थानच्या शैक्षणिक विकासातील योगदान | ४१३ |
| ५८. | प्रा.डॉ.बोधले चंपाताई श्रीरंग | मोहनराव पतंगराव पाटील यांचे ग्रामीण भागातील शैक्षणिक कार्य | ४१९ |
| ५९. | प्रा.डॉ.मारोती पोमा चव्हाण | गोदावरी परूळेकर यांच्या आदिवासी चळववळीचा अभ्यास | ४२४ |
| ६०. | प्रा.डॉ.रामचंद्र गुरुलिंग घुले | इतिहास लेखनातील 'ॲनल्स', धर्मशास्त्रीय, प्राच्यविद्या व राष्ट्रवादी लेखन प्रवाहांची तत्वमीमांसा | ४३३ |

# जत संस्थानातील ऐतिहासिक वास्तू व त्यांची सद्यस्थिती

**डॉ.सुरेश मारूती चव्हाण**

कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज

**प्रस्तावना :**

मध्ययुगीन भारतात अनेक संस्थाने उदयास आली होती. संपूर्ण भारताचा विचार करता ५६२ तर महाराष्ट्राचा विचार करता १८ संस्थाने कार्यरत होती. महाराष्ट्रातील १८ संस्थानांमध्ये 'जत' हे एक महत्त्वाचे संस्थान होते. सटवाजी चव्हाण उर्फ डफळे यांच्या नेतृत्वाखाली इ.स.१६८६ मध्ये स्थापन झालेले हे संस्थान १९४८ पर्यंत अस्तित्वात होते. मागासलेपण व सतत पडणारा दुष्काळ हे या संस्थानाची खास वैशिष्ट्ये असली तरी त्यावर मात करण्यासाठी आधीपतींनी केलेले प्रयत्न खरोखरच वाखाणण्याजोगे होते.[१] जत संस्थानाच्या अधिपतींकडून राज्यकारभार करीत असताना संस्थानाच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या अनेक ऐतिहासिक वास्तूही उभारण्यात आल्या होत्या. यामध्ये प्रामुख्याने राजवाडे, मंदिरे, पुतळे, समाध्या, शाळा व विविध प्रकारच्या इमारती यांचा समावेश होतो. याशिवाय रामपूरचा किल्ला जत संस्थानच्या अनेक ऐतिहासिक घटनांचा प्रत्यक्ष साक्षीदार आहे. या सर्व ऐतिहासिक वास्तू म्हणजे स्थापत्यकेलचा उत्तम नमुना असून जत संस्थानची बोलकी प्रतीकेच आहेत. पण दुर्दैवाने या सर्व ऐतिहासिक वास्तूंची आज मात्र प्रचंड दुरावस्था झाली आहे. एवढे नव्हे तर ती जतन व संवर्धन करण्यासाठी कसलाही खास प्रयत्न केला जात नसल्यामुळे या वास्तु नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. म्हणूनच संस्थानातील महत्वाच्या ऐतिहासिक वास्तू व त्यांची सद्यस्थिती यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**जत संस्थानची पार्श्वभूमी :**

जत हे सातारा, सांगली, सोलापूर आणि बेळगांव यांच्या मध्यभागी वसलेले संस्थान होते. याची स्थापना सटवाजी डफळे यांनी १६८६ च्या सुमारास केली. संस्थानात ११९ खेड्यांचा समावेश असून ९८१ चौ.मैल इतके क्षेत्रफळ होते. ०३ लक्ष रूपये वार्षिक उत्पन्न असणाऱ्या या संस्थानाची लोकसंख्या सुमारे ९० हजार इतकी होती.[२] या संस्थानात पुरूषांच्या बरोबरच स्त्रियांनाही आधिपती म्हणून यशस्वी

राज्यकारभार केलेला असून विजयसिंह डफळे हे शेवटचे अधिपती होते. त्यांच्याच काळात ८ मार्च १९४८ रोजी हे संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाले.[३]

**संस्थानातील ऐतिहासिक वास्तू :**

जत संस्थानात संस्थानाच्या वैभवात भर घालणाऱ्या व स्थापत्यकेलची साक्ष देणाऱ्या अनेक ऐतिहासिक वास्तू होत्या त्यामध्ये पुढील वास्तूंचा समावेश होतो.

१.राजवाडे (डफळापूर, जत, रामविलास पॅलेस )

संस्थानातील डफळापूर येथे बांधण्यात आलेला राजवाडा स्थापत्यकलेचा उत्तम नमुना आहे. आदिलशहाकडून जहागीर मिळाल्यानंतर स्वतंत्र कारभार करण्यासाठी संस्थानचे संस्थापक सटवाजी राजे यांना हा राजवाडा बांधला. डफळापूर ही प्रथम राजधानी होती. चार बाजूंनी राजवाडा बुलंद संरक्षक भिंतीने मजबूत असून बाजुला बुरूज होते. ६ एकर परिसरातील हा वाडा आज ही चांगल्या स्थितीत असून तिथे शाळा भरते. पूर्वेस श्रीरामाचे छोटे पण रेखीव मंदिर आहे. त्यामधील मूर्ती काळ्या गारेच्या असून राम, सीता, लक्ष्मण व हनुमान यांच्या मूर्ती आहेत. राजवाड्यावर चिनगीबाबांचे पांढरे निषाण लावण्याची परंपरा आहे. पूर्व बाजूस एक भव्य कमान असून तिला संस्थानी लोक थोरली वेस म्हणून संबोधत असत.

जत येथील राजवाड्यासंबधी कोणता ही ठोस पुरावा सापडत नसला तरी आजही वाड्याचे बरेच अवषेश पहावयास मिळतात. पूर्वेस राजवाड्याचे मुख्य व भव्य प्रवेशद्वार असून चार बाजूंना संरक्षक बुरूज आहेत. आतमध्ये बुरूजाजवळ महान अवलिया चिनगीबाबांचा हुडा व राममंदिर आहे. बाजूलाच नंतरच्या काळात श्रीमंत आऊसाहेब डफळे यांचे छोटे मंदिर व इतर राजांचे मुखवटे बसविलेले आहेत. आतील बाजूस सरकारच्या निवासस्थानाच्या अनेक खोल्या असून मध्ये सुंदर पटांगण आहे. बाजूलाच बैलाचे जूने जाते पहावयास मिळते. तिथेच संस्थानचा राजदरबार भरविला जायचा. षिवाय रामनवमी, कृश्णजन्माष्टमी यासाखे उत्सव या वाड्यात होत असत. त्यावरून हा वाडा सटवाजींच्या काळात बांधला असावा असे वाटते[४].

मधला वाडा म्हणून ओळखला जाणारा पश्चिमेच्या बाजूचा वाडा हा सुध्दा फार वर्षापूर्वीचा असून तो संस्थानचे कारभारी यांचे निवासस्थान होते. हाच संस्थानाचा मुख्य वाडा असून तो 'रामविलास पॅलेस' या नावाने ओळखला जातो. हा वाडा मोठ्या परिसरात असून तीन मजली आहे. वाड्याची रचना उत्तम इमारतीप्रमाणे अत्यंत सुंदर व सुबक असून बांधकाम करताना स्वच्छ व मुबलक हवा आणि प्रकाश

मिळावा अशी योजना केलेली आहे. राजवाड्यास छोट्या दगडांची सरंक्षक भिंत असून तो दक्षिणाभिमुख आहे. कारण राजवाड्यातील उत्तरेकडील खिडकीतून डोंगर निवासनी अंबाबाईचे उत्तम दर्षन व्हावे व गृहस्थापत्यातील दोष नाहीसा व्हावा यासाठी प्रवेशद्वार उत्तरेस आहे. राजवाड्याच्या बांधकामासाठी काळ्या पाषाणाच्या दगडाचा वापर केला आहे. राजवाड्यात जिकडे-तिकडे पंखे व विजेचे दिवे बसवण्याची उत्तम सोय केलेली दिसते. वाड्यात दरबार हॉल, स्वयंपाकगृह, पुढील बाजूचा लहान हॉल, सभोवताली विविध खोल्या, वरच्या मजल्यावर चार खोल्या बांधलेल्या आहेत. समोरच्या बाजूला लतामंडप व छोटेसे क्रीडांगण असून ठिकठिकाणी कारंजे बसविलेले आहेत. तिसऱ्या मजल्यावरील बांधकामासाठी सुंदर कौलांचा वापर केला आहे. पष्चिम बाजूस एक प्राणीसंग्रहालय असून तिथे वाघ, सांबर, वेगवेगळ्या जातीची हरणे, मोर वगैरे प्राणी होते. हा वाडा श्रीमंत रामराव डफळे यांच्या काळातील असून त्यास आज सुमारे १२० वर्षे झालेली आहेत.[५]

२) मंदिरे (जतचे बंकेश्वर, उमराणीचे हेमलिंगेश्वर)

**जतचे बंकेश्वर मंदिर** :- जतमध्ये जी काही महत्त्वाची मंदिरे आहेत त्यापैकी एक महत्त्वाचे मंदिर हे बंकेश्वराचे होते. कारण त्याला मुख्य ग्रामदैवत मानले जाते.[६] हे मंदिर जत मधील ब्राह्मणपूरी नावाच्या भागात असून ते हेमाडपंथी स्वरूपाचे आहे. दक्षिणेतील चालुक्य राजा विक्रमादित्य ६ वा त्याने आपल्या कारकिर्दीत (९-१० वे षतक) जत परिसरात अनेक शिवमंदिरे बांधल्याचे शिला लेखात उल्लेख सापडतो. त्यांनी या परिसरात ५ ज्योतिर्लिंगे स्थापन केली होती. पैकी बंकेश्वर, हेमलिंगेश्वर, आणि मुचकुंदेश्वर ही जत परिसरात आणि उमारामेश्वर व संगमेष्वर ही कर्नाटकात समाविष्ट होती. जत येथील ऐतिहासिक बंकेश्वर मंदिराच्या उभारणीविषयी अनेक दंथकथा असल्या तरी त्यातील एक दंतकथा अशी आहे की, जतचे पूर्वीचे नांव जयंती असून येथे जयंतीनगरीत भीमाने नरबळीला चटावलेल्या बकासूराचा वध केला होता. एखादे अचाट, समाजहिताचे वीरकृत्य केले की त्या ठिकाणी शंकराचे लिंग स्थापन करण्याची पूर्वी प्रथा होती. त्याला अनुसरून भीमाने येथे लिंग स्थापन करून त्यास 'बंकेश्वर' असे नाव दिले.[७]

याषिवाय बंकेश्वराच्या मंदिराच्या भिंतीत हाळेकन्नड भाशेतील एक शिलालेख आहे. त्यातही अनेक दंतकथा असल्याचे म्हटले असून त्यावरून विक्रमादित्य ६ वा या राजाने उभारलेल्या पाच ज्योतिर्लिंगापैकी जतचे बंकेश्वर हे एक मंदिर असल्याचे

स्पष्ट होते. मंदिरातील लिंग हे महाभव्य स्वरूपाचे असून ते माणसाच्या कवेत मावण्याजोगे नाही. खरे तर एवढे मोठ्याा आकाराचे शिवलिंग सहसा कोठे आढळत नाही. पण या मंदिरात आढळते हे याचे खास वैशिष्ट्य होय.[८] चालुक्य राजा विक्रमादित्य ६ वा याच्या काळात बांधण्यात आलेल्या या मंदिरास अनेक राजांनी देणग्या दिल्याचा उल्लेख मिळतो. चालुक्य षैलीची मंदिरे महाराष्ट्रात फारसी नाहीत असे मत प्रा.शेनोलीकर व डॉ.देशपांडे यांनी आपल्या 'महाराष्ट्र संस्कृती आणि विकास' या ग्रंथात नमूद केले आहे. पण यास जतचे बंकेष्वर मंदिर अपवाद असल्याचे दिसून येते.

**उमराणीचे हेमलिंगेश्वर मंदिर :** जत संस्थानातील उमराणी या गावास इतिहासात अनन्यसाधारण महत्त्व आहे. चालुक्य घराण्यापासून जतच्या डफळे घराण्यापर्यंत अनेक राजवटींनी या प्रदेशावर राज्य केले आहे. शिवछत्रपतींचे बाणेदार सेनापती प्रतापराव गुजरांची लढाई, स्वतंत्र राज्यकारभार, हजारो वर्षापूर्वीचे हेमलिंगेश्वर मंदिर, श्रीदानम्मा देवीचे जन्मस्थान आणि शिलालेख इत्यादीमुळे उमराणीचे नाव इतिहासात अजरामर झाले आहे.

उमराणी गावच्या बाजूलाच सुमारे एक हजार वर्षापूर्वीचे सुबक अवस्थेतील हेमलिंगेश्वर मंदिर होते व ते आजही आहे. काळ्या पाषाणात कोरलेले हे मंदिर विशिष्ट पद्धतीने बांधलेले असून त्यावरील नक्षीकाम (घडीवकाम) वाखाणण्याजोगे आहे. त्यामुळे हेमलिंगेश्वर मंदिर हे स्थापत्यकलेचा एक उत्कृष्ट नमुना आहे.[९] त्यावर प्रकाश टाकणारा अतिप्राचीन असा शिलालेख इ.स. १९५० च्या दरम्यान मिळाला. या मंदिराच्या डाव्या बाजूस असणाऱ्या शिलालेखात त्याविषयीची बरीच माहिती विशद करण्यात आली आहे. काळाच्या ओघात ९० ओळीच्या या शिलालेखातील बराचसा मजकूर अस्पष्ट झालेला असून त्याचे काही तुकडे उडालेले आहेत.हा शिलालेख हाळीकन्नड भाषेतील आहे. चालुक्य राजा ६ वा विक्रमादित्य याने उमराणी येथे हेमलिंगेश्वराची भक्तीभावाने स्थापना करून मंदिर बांधले. शिलालेखावर विक्रमादित्य राजाच्या घराण्यातील राजा तैलप याच्यापर्यंतची वंशावळ नमुद केलेली आहे. राजाचा अधिकारी हेमाडीदेव याचीही वंशावळ दिलेली आहे. शिवाय त्याची पत्नी चंडलादेवी, राजपुत्र दोलारसादेव व वनसिमहादेव यांचाही उलेख मिळतो. चंडलादेवीने या मंदिराच्या पूजेअर्चेसाठी जमीन व करांचे उत्पन्न व तेलाचा घाणा दिल्याची नोंद आहे. शिलालेखात देणगीची तारीख इ.स. ११२३ अशी मिळते पुढे

मंदिराचा कारभार राणी चंडलादेवी, राजकुमार वनसीमहादेव यांनी चंद्रभरणपंडितदेव यांच्या हाती सोपविला होता. या शिलालेखात हेमाडीदेव यांच्या वंशावळीबरोबरच त्यांच्या राजवटीवरही कार्य प्रकाश टाकण्यात आला आहे. त्यामध्ये हेमाडदेव हा चालुक्यराजा पुढे कोपनपूर येथील राजा झाल्याचे म्हटले आहे. तर त्याला महामंडलेश्वर व कोपनपूरवर्धीश्वर अशी बिरूदे लावण्यात आलेली होती. मंदिर उंचीपेक्षा रूंदीला जास्त असून समोरील बाजूस नंदी व इतर काही देवतांच्या मूर्त्या आहेत. तर गाभाऱ्यात एकसंघ प्रमाणात कोरलेली महादेवाची पिंड असून त्यावर टप्प्या-टप्प्यांनी असलेले उंच शिखर आहे. गाभाऱ्याच्या समोरील व बाजूचे स्तंभ हे कोरीव एकसंघ दगडांचे असून सुंदर नक्षीकाम केलेले आहेत.[१०]

३)छत्री बाग (अधिपतींचे पुतळे, कारंजा व समाध्या )

श्रीमंत विजयसिंह डफळे यांच्या कारकीर्दीत तयार करण्यात आलेल्या छत्रीबागेतही अनेक बांधकामे आहेत. आत प्रवेश करताना सुंदर रेखीव स्वरूपाची उंच कमान लागते. त्यानंतर डाव्या बाजूला जत संस्थानांच्या पूर्वजांच्या समाध्या असून त्या अतिशय घडीव स्वरूपाच्या, काळ्या घडीव दगडांच्या व मजबुत आहेत. त्यांच्यावर महादेवाची पिंड व पादुके बसवलेले आहेत. त्यासमोर नागाच्या ५ फड्यांची कारंजी बसवलेली आहेत. तर उजव्या बाजूला एक हौद असून बागबगीचा आहे. दगडी कुंड्या असून त्यात शोभेची झाडे लावली जात. एका हौदात खास कमळाची फुले लावली जात. चार एकर परिसरातील या बागेचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे समोरच असणारा रामराव महाराजांचा आकर्षक संगमरवरी पुतळा होय. हा पुतळा व बांधकाम करण्यासाठी खास राजस्थानमधून कारागीर आणण्यात आले होते. शिवाय कैद्यांचाही वापर करण्यात आला होता. संगमरवरी बैठ्या अवस्थेतील श्रीमंत रामरावांची मूर्ती (पुतळा) अतिशय जिवंत व आकर्षक वाटतो. दरवर्षी या छत्रीबागेत श्रावणात रामराव उत्सव मोठया प्रमाणात भरतो.[११]

४) किल्ले रामपूर

जत संस्थानात एकच डोंगरी किल्ला आहे तो म्हणजे रामपूर होय. तो कोणत्या कालखंडातील आहे. याबाबत ठोस पुरावा मिळत नाही. तरी बांधकाम पाहता तो शिवपूर्वकालीन किंवा कलचुरी काळातील असावा असा तर्क केला जातो. जतपासून पश्चिमेला ४ मैल अंतरावरील रामपूर गावाच्या उंच डोंगरावर हा किल्ला असून तो ओबडधोबड दगडांपासून तटबंधीने बांधला गेला आहे. यास कुठेही बुरूज नसून

तटबंदीला वेगळा भाग करून बुरूजासारख्या उंचवट्याच्या जागा दिसतात. डाव्या बाजूच्या एका उंच भागावर (बुरूजावर) भगवा लावण्याची पध्दत पूर्वीपासूनच आहे. पुढे गेल्यावर एक प्राचीन शिवमंदिर पडलेल्या अवस्थेत पहावयास मिळते. त्यासाठी फक्त उभ्या, आडव्या, मोठ-मोठ्याा दगडी शीळांचा वापर केलेला दिसतो. त्यास अर्धमंडप व गाभारा असे भाग असून गर्भगृहात साध्या शंकराच्या पिंडिची प्रतिश्ठापना केलेली आहे. हा स्थापत्यकलेचा आदर्श नमुना असला तरी आज मात्र हा किल्ला दुर्लक्षामुळे भग्नावस्थेत (पडलेल्या) पहावयास मिळतो.[१२]

ऐतिहासिक वास्तूंची सद्यस्थिती :

जत संस्थानाच्या वैभवात भर घालणाऱ्या वरील ऐतिहासिक वास्तूंची सद्यस्थिती मात्र निष्चितच विचार करायला लावणारी आहे. एकेकाळी अतिषय दिमाखात उभी असणारी ही ऐतिहासिक स्थळे आज मात्र निस्तेज पडलेली आहेत. वास्तूंच्या भिंती, कमानी, बुरूज, कारंज्या, समाध्या, तटबंदी यासारखे महत्त्वाचे घटक तर उद्ध्वस्त झालेले आहेतच पण त्याच बरोबर जुना राजवाडा, रामपूरचा किल्ला, समाध्या यासारख्या अखंड वास्तूच नामषेश झालेल्या पाहावयास मिळतात. या ऐतिहासिक वास्तूंना भेट देत असताना जतन व संवर्धन करण्याची त्या आतुरतेने वाट पाहत असल्याचा भास होतो.[१३] खरतर या वास्तूंची एवढी दयनीय अवस्था झाली आहे की या संस्थानाच्या वैभवाची साक्ष देणाऱ्या वास्तु खरोखरच होत्या का असा प्रष्न पडतो.

सारांश :

जत संस्थानच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर नजर टाकल्यास त्याचे स्वतंत्र अस्तित्व सिध्द होते. अनेक अधिपतींनी कल्याणकारी राज्यकारभार करत असतानच अनेक ऐतिहासिक वास्तूही उभारल्याचे पहावयास मिळते. गेली कित्येक दिवस या वास्तू जत संस्थानाच्या पराक्रमाची, स्थापत्यशैलीची व उज्ज्वल वारशाची साक्ष देत उभ्या आहेत पण दुर्दैवाने अलीकडच्या कालखंडामध्ये त्यांची मोठया प्रमाणात दुरावस्था झाल्याचे दिसून येते. आपल्याच डोळ्यासमोर या वास्तू नामशेष होत असताना त्याचं आपणास काहीच वाटू नये यासारखी दुसरी शोकांतिका या वास्तूंची काय असू शकते ? या वास्तूंची सद्यस्थिती पाहता मला असे वाटते की, आपण त्यांच्या जतन व संवर्धनाचा प्रयत्न न केला नाही तर पूर्णपणे उध्वस्त झालेले भग्न अवशेष पाहण्याचे दुर्भाग्य पुढच्या पिढ्यांवर आल्याशिवाय राहणार नाही. म्हणून अशा ऐतिहासिक वास्तूंचे जतन व संवर्धन करणं ही खरोखरच काळाची गरज आहे.



अधिपतींची समाधी



राजवाड्याचा भाग

संदर्भग्रंथ सूची :


१) जी.डी. दळवी, मराठा कुळांचा इतिहास भाग -३, चव्हाण उर्फ डफळे घराण्याची कैफियत, मुंबई १९१३,पान नं.४

२) व्ही.जी.भिडे, जत संस्थनाचा संक्षिप्त इतिहास,आर्यभूषण छापखाना, पुणे १९२४ पान नं४,५,१९,२०

3) Bombay Archives, op.cit,p.no.M-17,18,91

४) मुलाखत, श्रीमंत भगवानराव डफळे जत, दिनांक २६/०५/२०१३

५) व्ही.जी.भिडे, उपरोक्त कित्ता,पान नं.१०

6) Maharashtra State Gazetteers, Sangali Dist- 1969, P.No 688.

७) दैनिक तरूण भारत, 'जत संदर्भ विशेषांक' फेब्रुवारी २०११ पान नं.५८

८) दैनिक महासत्ता, विजय नाईक लिखित 'इतिहासच्या आठवणी भाग.८. दिनांक १३ नोव्हेबर १९९७.

९) जत तालुका डिरेक्टरी.

१०) दैनिक तरूण भारत 'जत संदर्भ विशेषांक' उपरोक्त कित्ता, पा.नं. ९१.

११) मुलाखत,रामू शिवाप्पा कांबळे जत, दि.२६/०५/२०१३

१२) अदित्य फडके, सफर सांगली -कोल्हापूरची स्नेहल प्रकाशन पुणे २०१२ पान नं.९२

१३) प्रत्यक्ष भेटी (Field Work)


❑ ❑ ❑